**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार**

(गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन सुनावणी )

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४१३ ००१

**तक्रार क्रमांक १२५०/२०१८ (द्वितीय अपील क्र.२४२५/२०१८मध्ये)**

श्री.रविंद्र गणपतराव धावणे,
रा.१२ प्रगती म्हात्रे चाळ, प्रेमसंबंध-रामनगर,
भांडूप, पूर्व मुंबई ४०००४२

**तक्रारदार**

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
कार्यालयीन अधीक्ष्क,
उपसंचालक यांचे कार्यालय,
भुमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद

: **उत्तरवादी**

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
भुमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश औरंगाबाद

**( सुनावणी दिनांक ३०.०८.२०२१)**

**निर्णय**

तक्रारदार यांनी दि.१४.११.२०१८ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे द्वितीय अपील क्र २४२५/२०१८ मध्ये आयोगाने दि.२७.०६.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही झाली नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीची गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल तक्रारदार आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. तसेच सदर नोटीस आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आली त्यानुसार आज रोजी प्रकरणात गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन सुनावणी घेण्यात येत आहे. ऑनलाईन सुनावणीसाठी तक्रारदार, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन व युक्तीवादावरुन, आयोगाने द्वितीय अपील क्र.२४२५/२०१८ मध्ये दि.२७.०६.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दि.२९ /१०/२०१८ रोजीच्या पत्रासोबत अर्जदारास शपथपत्र उपलब्ध करुन दिले असल्याचे दिसून येत आहे. तसेच आज रोजी सुनावणीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा लेखीयुक्तिवाद आयोगासमोर सादर केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केली असल्याचे दिसून येत असल्यामुळे विचाराधिन तक्रार निकाली काढण्याच्या निर्णय आयोग घेत आहे.

प्रसंगावशात,जनमाहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहिती संदर्भात तक्रारदार यांची काही प्रशासकीय स्वरुपाची तक्रार असल्यास त्या संदर्भात तक्रारदार यांनी संबंधित सक्ष्म प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्या संदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त विवेचनाच्या अधिन राहून तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

( दिलीप ल. धारुरकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र. 14526 दि. 21/12/2021